सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 2205

दिनांक :- 04 AUG 2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाच्या प्रभावी अमलबजावणीबाबत.**

**संदर्भ :-** १.शासन पत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग क्रमांक :- मनासो-२०२३/प्र.क्र.११८/कौशल्य २ दिनांक २६ जुलै २०२३.

२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :-१७/तंशिस/इनोव्हेशन चॅलेंज/२०२३/२०२ दिनांक २८ जुलै २०२३.

राज्यातील नाविन्यपुर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागांर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपुर्ण स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यात आलेले असून सदर धोरणाच्या प्रभावी अमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरीता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप विक यासारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मुर्तस्वरुप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" चे आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वन साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे, हे या उपक्रमाचे उद्दीष्ट आहे. सदर उपक्रमाचे अनावरण दिनांक १५ जूलै २०२३ रोजी मा. मंत्री, कौशल्य, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आलेले असून सदर उपक्रमात राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सहभागी होता येईल.

| **पहिला टप्पा : संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड** | |
|---|---|
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जूलै -- १५ ऑगस्ट २०२३. |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट -- ३१ ऑगस्ट २०२३ |
| संस्थास्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेम्बर -- २० सप्टेम्बर २०२३. |
| संस्था निहाय सर्वोत्कष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंम्बर, २०२३. |
| **दुसरा टप्पा :** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेम्बर, २०२३. |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेम्बर ते ५ ऑक्टोबर २०२३. |
| जिल्हा स्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोबर ३ १५ ऑक्टोबर २०२३. |
| प्रत्येक जिल्हयातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोबर २०२३. |
| **तिसरा टप्पा :** | |
| इनक्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करुन इनक्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इनक्युबेशन सहाय्य |
| इनक्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

महाराष्ट्र स्टुडट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकत संकेतस्थळ www.msins.in व https://schemes.msin.in वर उपलब्ध आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, या उपक्रमाबाबत योग्य ती नोंद घेऊन या उपक्रमात आपल्या संस्थेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची नोंदणी करुन सदर उपक्रमाचा लाभ घेण्याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन प्रोत्साहीत करावे. तसेच या उपक्रमात जास्तीतजास्त संस्थांनी सहभाग नोंदवावा असे या कार्यालयामार्फत आवाहन करण्यात येत आहे. अधिक माहितीकरीता संदर्भ १ व २ चे पत्र जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/इनोव्हेशन चॅलेंज /२०२३/२०२ दिनांक : 28 JUL 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**विषय** : "महाराष्ट्र स्टुंडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत...

**संदर्भ** : शासन पत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग क्र. मनासो-२०२३/प्र.क्र.११८/कौशल्य-२, दिनांक २६ जुलै, २०२३

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागांतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यांत आले असून, सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजवणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौध्दिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यांत येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत **"महाराष्ट्र स्टुंडंट इनोव्हेशन चॅलेंज"**चे आयोजन करण्यांत येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

या उपक्रमाचे अनावरण दिनांक १५ जुलै, २०२३ रोजी मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यांत आले असून, राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सदर उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

या उपक्रमाचे प्रस्तावित वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| पहिला टप्पा : संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड | |
|---|---|
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै — १५ ऑगस्ट, २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट — ३१ ऑगस्ट, २०२३ |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेंबर — २० सप्टेंबर, २०२३ |
| संस्था निहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर, २०२३ |

| | |
|---|---|
| दुसरा टप्पा : | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर, २०२३ |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर — ५ ऑक्टोबर, २०२३ |
| जिल्हा स्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोबर — १५ ऑक्टोबर, २०२३ |
| प्रत्येक जिल्ह्यातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोबर, २०२३ |
| तिसरा टप्पा : | |
| इनक्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करुन इनक्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इनक्युबेशन सहाय्य |
| इनक्युबेशन प्रोग्राम | |
| राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | |

महाराष्ट्र स्टुंडंट इनोव्हेशन चॅलेंजबाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थ www.msins.in व https://schemes.msins.in वर उपलब्ध आहे.

तरी, आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / अनुदानित / विना अनुदानित संस्थांना या उपक्रमाबाबत अवगत करुन या उपक्रमात सदर संस्थांमधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन सदर उपक्रमाचा लाभ घेण्यास प्रोत्साहन देण्याबाबतच्या सूचना द्याव्यात. तसेच सदर उपक्रमाबाबत जास्तीत जास्त संस्थांनी सहभाग नोंदविणे आवश्यक असून, संस्थांच्या सहभागाबाबतचा वेळोवेळी आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल संचालनालयास सादर करण्यांत यावा.

(डॉ. विनोद मोहितकर)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.

E:\desk-19\Mali\TEQIP Letter-2023.doc

जा.क्र.: मनासो 2023/प्र.क्र.११८/कौशल्य-2
कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २६/०७/२०२३

आशिष कुमार सिंग, भा. प्र. से.
अपर मुख्य सचिव

विषय : "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत.

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यात आले. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता, इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौद्धिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत **महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे** आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरवणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत,

- महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी नवउद्योजक व त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेवून त्यांना आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे
- सदर नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ज्ञ मार्गदर्शन, निधी व आवश्यक पाठबळ पुरवणे
- परिणामी राज्यातील नाविन्यपूर्ण परिसंस्था बळकट करणे

उ.स.(मोरे)

या उपक्रमाचे अनावरण दि. १५ जुलै २०२३ रोजी मा. मंत्री कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील शासकीय व खासगी विद्यापीठांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व शैक्षणिक संस्था तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सहभाग घेता येईल. सदर उपक्रमाचे मार्गदर्शक तत्वे सोबत जोडण्यात आले आहेत.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आपणास खालील बाबींसाठी नियोजन करण्याची विनंती आहे,

१. आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या सर्व विद्यापीठांनी या उपक्रमात नोंदणी करून सहभाग नोंदवावा यासाठी योग्य ते निर्देश देण्यात यावेत.
२. नोंदणीनंतर सर्व विद्यापीठांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागासाठी प्रवृत्त करणे.
३. या उपक्रमाचे आयोजन व यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सूचना देणे.

वेळापत्रक (प्रस्तावित)

| | |
|---|---|
| **पहिला टप्पा : संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड** | |
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै - १५ ऑगस्ट २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | १ ऑगस्ट - ३१ ऑगस्ट |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेंबर - २० सप्टेंबर |
| संस्थानिहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर |
| **दुसरा टप्पा** | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर - ५ ऑक्टोबर |
| जिल्हास्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोबर - १५ ऑक्टोबर |
| प्रत्येक जिल्ह्यातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोबर |
| **तिसरा टप्पा** | |
| इन्क्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करून इन्क्युबेशन प्रोग्रामला सुरुवात<br>इन्क्युबेशन प्रोग्राम<br>राज्यस्तरावर सादरीकरण सत्र आणि विजेत्यांची घोषणा | १२ महिन्यांसाठी इन्क्युबेशन सहाय्य |

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज बाबत नोंदणी प्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थळ www.msins.in व https://schemes.msins.in वर उपलब्ध आहे. आपल्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठांना या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवण्याबाबत अवगत करावे. मला विश्वास आहे की, आपल्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज हा उपक्रम यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात येईल व राज्याच्या स्टार्टअप व नाविन्यता परिसंस्थेस अजून बळकटी मिळेल.

आपले स्नेहांकीत,

(स्वाक्षरी)

**आशिष कुमार सिंग, भा. प्र. से.**
**(अपर मुख्य सचिव)**

प्रति,
श्री. विकास चंद्र रस्तोगी,
प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य